# महाराष्ट्र विधानपरिषद

## दिवसाच्या कामकाजाचा क्रम

### मंगळवार, दिनांक १७ डिसेंबर,२०२४

### (दुपारी १२.०० वाजता)

**एक : सभापतींच्या निवडणुकीबाबत मा. राज्यपालांचा संदेश**

**दोन : सभापतींच्या निवडणुकीच्या कार्यक्रमाची घोषणा**

**तीन : म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचना — (असल्यास)**

**चार : म.वि.प. नियम १०१ — अ अन्वये विशेष उल्लेख — (असल्यास)**

**पाच : राज्यपालांच्या अभिभाषणावर चर्चा (पहिला दिवस)**

**- मध्यंतर -**

**सहा : शासकीय विधेयके —**

**विचार, खंडशः विचार व संमत करणे :-**

(१) **"सन २०२४ चे वि.प.वि. क्रमांक ९ - महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ (दुसरी सुधारणा) विधेयक, २०२४"**

**विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.एकनाथराव खडसे, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२४ चे वि.प.वि. क्रमांक ९ - महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ (दुसरी सुधारणा) विधेयक, २०२४" विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या २० सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

अमुद्रित प्रत

(२) **"सन २०२४ चे वि.प.वि. क्रमांक १० - महाराष्ट्र सार्वजनिक ग्रंथालये (सुधारणा) विधेयक, २०२४"**
**विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.एकनाथराव खडसे, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२४ चे वि.प.वि. क्रमांक १० - महाराष्ट्र सार्वजनिक ग्रंथालये (सुधारणा) विधेयक, २०२४" विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या २० सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(३) **"सन २०२४ चे वि.प.वि. क्रमांक ११ - महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (दुसरी सुधारणा) विधेयक, २०२४"**
**विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.एकनाथराव खडसे, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२४ चे वि.प.वि. क्रमांक ११ - महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (दुसरी सुधारणा) विधेयक, २०२४" विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या २० सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(४) **"सन २०२४ चे वि.प.वि. क्रमांक १२ - महाराष्ट्र खाजगी विद्यापीठे (स्थापना व विनियमन) (दुसरी सुधारणा) विधेयक, २०२४"**
**विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.एकनाथराव खडसे, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२४ चे वि.प.वि. क्रमांक १२ - महाराष्ट्र खाजगी विद्यापीठे (स्थापना व विनियमन) (दुसरी सुधारणा) विधेयक, २०२४" विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या २० सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**सात** : **सर्वश्री प्रविण दरेकर**, हेमंत पाटील, विक्रम काळे, परिणय फुके, डॉ.मनिषा कायंदे, सर्वश्री अमोल मिटकरी, सदाशिव खोत, श्रीमती भावना गवळी, प्रा.राम शिंदे, सर्वश्री कृपाल तुमाने, प्रसाद लाड, श्रीकांत भारतीय, निरंजन डावखरे, राजहंस सिंह, योगेश टिळेकर, विक्रांत पाटील, रणजितसिंह मोहिते-पाटील, श्रीमती चित्रा वाघ, श्रीमती उमा खापरे, सर्वश्री किशोर दराडे, पंकज भुजबळ, शिवाजीराव गर्जे, इद्रिस नाईकवाडी, **वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव –**

"सन २०१४ ते २०१९ या कालावधीत तत्कालीन सरकारने राज्यातील जनतेच्या दृष्टीने अतिशय महत्वाचे असणारे परंतु अनेक वर्षापासून प्रलंबित असणारे प्रकल्प जसे की, नवी मुंबई विमानतळ, शिवडी न्हावाशेवा सागरी महामार्ग, महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे इंदू मिल येथील स्मारक, विदर्भातील सिंचनाचा अनुशेष इत्यादी प्रकल्पांना गती मिळणे, परिणामी आज हे सर्व महत्वकांक्षी प्रकल्प दृष्टीक्षेपात येणे, नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीमध्ये परत महायुती सरकार सत्तेवर आल्याने, विदर्भ मराठवाड्यासह संपूर्ण महाराष्ट्रातील जनतेमध्ये राज्यातील जनतेसाठी विशेषतः शेतकऱ्यांसाठी महत्वाचे असणारे वैनगंगा-नळगंगा-पैनगंगा नदीजोड प्रकल्प, मराठवाडा वॉटर ग्रीड, POCRA टप्पा- २ तसेच जलयुक्त शिवार टप्पा-२ सारखे महत्त्वाकांक्षी प्रकल्प तातडीने मार्गी लागतील अशी आशा निर्माण होणे, राज्यातील शेतकऱ्यांच्या विशेषतः विदर्भातील शेतकऱ्यांसाठी अतिशय महत्वाचे असणाऱ्या वैनगंगा-पैनगंगा नदीजोड प्रकल्पाला, तत्वतः मान्यता गत महायुती सरकारने दिलेली असल्याने, हा प्रकल्प तातडीने सुरु करून विदर्भातील सर्व शेतकऱ्यांसाठी सिंचनाची सुविधा कायमस्वरूपी उपलब्ध करून देण्याची आवश्यकता; त्याकरीता, या प्रकल्पाची कालबध्द रीतीने अंमलबजावणी करावी, अशी जनतेमधून होत असलेली मागणी, विदर्भ तसेच मराठवाड्यातील दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना दुष्काळी परिस्थितीची झळ कमी व्हावी, याकरीता महाविकास आघाडी सरकारच्या कालावधीत कार्यवाही न झालेल्या जलयुक्त शिवार टप्पा-२, तसेच नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प (POCRA) टप्पा-२ ह्या प्रकल्पांची अंमलबजावणी तातडीने सुरु करण्याची शेतकरी बांधवांकडून होत असलेली मागणी, तसेच विदर्भ, मराठवाड्यातील अनुशेष दूर व्हावा याकरीता विविध प्रकल्पांना गती देण्याची आवश्यकता, संपूर्ण राज्यातील शेतकऱ्यांसाठी, अतिशय महत्वाचे असणारे पांदण रस्ते तातडीने पूर्ण व्हावे याकरीता "मातोश्री पांदण रस्ते" योजने मध्ये शेतकऱ्यांच्या हिताच्या दृष्टीने बदल करून, या योजनेची

अंमलबजावणी सुटसुटीत व्हावी याकरीता आवश्यक ते प्रयत्न करण्याची आवश्यकता, मराठवाड्यातील जनतेसाठी महत्वाचा असणाऱ्या "मराठवाडा वॉटर ग्रीड" या महत्वाकांक्षी प्रकल्पास महायुती सरकारने २०१९ मध्येच तत्वतः मान्यता देणे, परंतु महाविकास आघाडी सरकारच्या कालावधीत या प्रकल्पावर कार्यवाही न होणे, आता परत महायुती सरकार सत्तेवर आल्याने ह्या प्रकल्पाना देखील गती मिळावी अशी मराठवाड्यातील जनतेची होत असलेली मागणी, विदर्भ, मराठवाडा व खानदेशातील जनतेच्या आयुष्यात खऱ्या अर्थाने समृध्दी आणणारा "हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे" समृध्दी महामार्ग महायुती सरकारच्या कालावधीत सुरु होणे, या महामार्गाच्या शेवटच्या टप्प्याचे लोकार्पण होवून हा महत्वाकांक्षी महामार्ग जनतेच्या सेवेसाठी तातडीने उपलब्ध व्हावा, अशी संपूर्ण राज्यातील जनतेकडून होत असलेली मागणी, सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांसाठी महायुती सरकारने हमी भावाने, सोयाबीनची विक्रमी खरेदी करणे, परंतु शेतकऱ्यांची वाढती मागणी लक्षात घेता, सदर खरेदी जानेवारीपर्यंत सुरु राहावी अशी शेतकरी बांधवांकडून होत असलेली मागणी, राज्यातील सर्व शेतकरी बांधवांना दिवसा वीज मिळावी याकरीता राज्यातील सर्व सबस्टेशनच्या परिसरात सोलर पार्क उभारण्याच्या योजनेला गती देण्याची आवश्यकता, शेतकरी बांधवांच्या या विविध समस्या सोडविण्याकरीता शासनाने करावयाची उपाययोजना व कार्यवाही, विदर्भातील शेतकऱ्यांसाठी मूल्यसाखळी निर्माण होऊन यांचे शेतमालास चांगला दर मिळावा याकरिता SMART व MAGNET सारखे प्रकल्प विदर्भामध्ये प्राधान्याने मान्यता देऊन सुरु करण्याची आवश्यकता, तसेच रोजगाराच्या विविध संधी उपलब्ध व्हाव्यात याकरिता उद्योग विभागाची समूह विकास योजना विदर्भामध्ये प्राधान्याने राबविण्याची आवश्यकता, महायुतीचे सरकार परत सत्तेवर आल्याने मुंबईसह MMRDA परिसरातील महत्वाचे पायाभूत सुविधांचे प्रकल्प, जसे की, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ, कोस्टल रोड, उर्वरीत मेट्रो प्रकल्प व इतर प्रकल्प तातडीने सुरु होऊन जनतेच्या सेवेत उपलब्ध होण्यासाठी तातडीने करावयाची कार्यवाही व त्यावर करावयाच्या शासकीय उपाययोजना."

**विधान भवन,**
नागपूर
दिनांक : १६ डिसेंबर, २०२४.

**जितेंद्र भोळे**
सचिव (१) (कार्यभार),
महाराष्ट्र विधानपरिषद.